सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

**जा. क्र.बार्टी/पुणे/योजना/२०२४-२५/६३४६** **दिनांक**:-०३/१२/२०२४

# महत्वाची सूचना

## IBPS तसेच पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कागदपत्र पडताळणी मुदतवाढ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे मार्फत ऑनलाईन प्रशिक्षण संस्था विकल्प निवड पोर्टलद्वारे, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्था निवडीकरीता विकल्प उपलब्ध करून देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या इच्छेनुसार, पसंतीनुसार योजना निहाय नामनिर्देशित (Empanel) केलेल्या प्रशिक्षण संस्थेची निवड केली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी पसंती दिलेल्या प्रशिक्षण संस्थाकडे जाऊन मूळ कागदपत्रे तपासणी करण्याबाबत ईमेल व confirmation Slip द्वारे कळविण्यात येत आहे, यामध्ये IBPS तसेच पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी प्राप्त ई-मेल व Confirmation Slip नुसार संबंधीत प्रशिक्षण संस्थेकडे दिनांक २१/११/२०२४ ते ०३/१२/२०२४ या दरम्यान कागदपत्र तपासणी करण्याकरिता मुदत देण्यात आलेली होती. तथापी या करिता पुढील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

**दिनांक ०३/१२/२०२४ पासून दिनांक १०/१२/२०२४ पर्यंत कागदपत्राची तपासणी करणे बंधनकारक आहे.**

ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक १०/१२/२०२४ पर्यंत कागदपत्रे तपासणी केली नसेल अशा विद्यार्थ्यांची निवड रद्द करून प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात येणार आहे. या बाबत कोणतेही निवेदन किंवा अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

सन २०२४-२०२५ करिता निवड झालेल्या ज्या विद्यार्थ्यांना यापूर्वी UPSC/MPSC/MPSC/ Police and Military Bharti व fellowship या योजनांचा लाभ घेतलेला आहे. अशा विद्यार्थ्यांची निवड रद्द करण्यात आली आहे. दुबार लाभार्थ्यांना confirmation Slip याबाबत कोणताही ई-मेल प्राप्त होणार नाही. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्यात दुबार लाभार्थी असल्याचे आढळून आल्यास निवड रद्द करून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर घोषणापत्रकाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ, ब, क नुसार विद्यार्थ्यांनी कागदपत्रे तपासणी दरम्यान कागदपत्रे सादर करणे बंधनकारक असेल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी,

**स्वाक्षरी**
(सुनील वारे)
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे**